नि. दि. दावा क्र. 45/2020
धोंडाबाई वि. राहुल
नि. क्र. 76 खाली

## उलट तपास प्रतिवादी क्रं. 4 तर्फे विधीज्ञ श्री. एस. आर. काळे यांच्यातर्फे शपथेवर पुढे चालू.

माझी जन्मतारीख 28/05/1983 ही आहे. हे खरे आहे की, सन 1974 साली दावा मिळकतीबद्दल कोणता व्यवहार झाला याची मला माहिती नाही. चंद्रकांत हे माझे चुलते होते. हे खरे नाही की, चंद्रकांत व लक्ष्मण या दोघात दावा मिळकीसंदर्भात काय व्यवहार झाला याची मला माहिती नाही. हे खरे नाही की, सन 1974 मध्ये लक्ष्मणकडून चंद्रकांतने तारण म्हणून दावा मिळकत घेतली. चंद्रकांत हे 2010 साली वारले. हे खरे आहे की, दावा मिळकतीसंदर्भात चंद्रकांतने एक दिवाणी दावा दाखल केला होता व सुरेंद्रनेही एक दावा दाखल केला होता. हे मला माहिती नाही की, माझे वडील साहेबराव भाउराव काशीद यांना चंद्रकांतने त्या दाव्यात कुलमुखत्यार म्हणून नेमले होते. हे खरे नाही की, त्या दोन्ही दाव्यात चंद्रकांतने अथवा माझया वडीलाने असे कोठेही म्हटले नव्हते की, दावा मिळकत एकत्र कुटूंबाच्या मिळकतीतून विकत घेतली आहे. चंद्रकांतला पत्नी व दोन मुली असे वारस होते. हे खरे आहे की, चंद्रकांतच्या मृत्यूनंतर चंद्रकांतने वारस व सुरेंद्र यांच्यात दावा मिळकतीसंदर्भात तडजोड झाली होती. हे मला माहिती नाही की, माझया वडीलांकडे कुळमुखत्यार असताना माझया वडीलांनी चंद्रकांतच्या मृत्यूनंतर माझया वडीलांनी व या प्रकरणातील वादी यांना पक्षकार म्हणून सामील करुन घ्यावे असा अर्ज दिला होता. हे मला माहिती नाही की, तो अर्ज न्यायालयाने नामंजूर केला. हे मला माहिती नाही की, त्या आदेशाविरुद्ध अपील दाखल केले नाही. हे खरे नाही की, 1974 साली नाममात्र चंद्रकांतच्या नावाने दावा मिळकती खरेदी केली होती असे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, ही दावा मिळकत विकत घेण्यासाठी वादीं व प्रतिवादी नं. 5 यांचे वडील यांनी पैसे दिले होते असेही खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, दावा मिळकतीवर वादी अथवा माझया वडीलांचा कधीही ताबा नव्हता. चंद्रकांत यांचे स्थायी कुटुंब बार्शीत होते. हे खरे नाही की, दावा मिळकती आमच्या एकत्र कुटुंबाची होती असे खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, दावा मिळकतीशी आमचा संबंध नाही. हे खरे आहे की, मला वडीलापार्जित प्रॉपर्टी नाही. 1974 साली चंद्रकात 22 वर्षाचा असेल. हे खरे नाही की,वादी आणि प्रतिवादी नं. 5 यांच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे. हे खरे नाही की, वादी व प्रतिवादी नं. 5 यांच्या सांगण्यावरुन मी शपथपत्रामध्ये खोटा मजकूर

लिहिला आहे. हे खरे आहे की, दावा मिळकती मालक या नात्याने सुरेंद्र याच्या ताब्यात आहे.

उलटतपास पुर्ण.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

Digitally signed by RAJU TUKARAM INGLE
Date: 2023.05.04 10:59:20 +0530

दिनांकः—02.05.2023

( आर.टी.इंगळे )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, परंडा